# महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या
# दिनांक : २०/१०/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता
# आयोजित केलेल्या २५८ व्या बैठकीचे कार्यवृत्त

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाची २५८ वी बैठक सोमवार, दिनांक २०/१०/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता सहयाद्री अतिथीगृह सभागृह नं.४, वाळकेश्वर, मुंबई-४०० ००६ येथे आयोजित करण्यात आली.

**सदरहू बैठकीस खालील प्रमाणे उपस्थिती होती :**

| | | |
|---|---|---|
| **१.** | **श्री. सतीश म.गवई,<br>उपाध्यक्ष / प्राधिकरण** | **: पदसिध्द अध्यक्ष/प्राधिकरण** |
| **२.** | **श्री.देबाशिष चक्रवर्ती<br>प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग** | **: सदस्य/प्राधिकरण** |
| **३.** | **श्री. मनुकुमार श्रीवास्तव,<br>प्रधान सचिव, नगरविकास विभाग** | **: सदस्य/प्राधिकरण** |
| **४.** | **श्री. सुधाकर वड्डे** | **: सदस्य / प्राधिकरण** |
| **५.** | **श्री.बाबाजी जाधव** | **: सदस्य / प्राधिकरण** |

सचिव / प्रा. यांनी सन्माननीय सदस्य आणि सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि बैठकीस सुरवात करण्यापूर्वी शासनाने म्हाडावर सदस्य म्हणून नेमणूक केलेले मा.श्री.सुधाकर वड्डे व मा.श्री.बाबाजी जाधव यांचे मा.उपाध्यक्ष / प्रा. यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तदनंतर मा.उपाध्यक्ष तथा पदसिध्द अध्यक्ष / प्रा. यांच्या परवानगीने विषय सुचीवरील विषय चर्चेस घेण्यात आले.

**बाब क्रमांक : २५८/१**

**विषय :- महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या दिनांक २५/०८/२०१४ रोजी झालेल्या २५७ व्या बैठकीचे आणि दिनांक २६/०८/२०१४ रोजी झालेल्या संलग्न बैठकीचे प्रारुप कार्यवृत्त स्थायी करण्याबाबत.**

---

उक्त विषय सचिव/प्राधिकरण यांनी सभागृहापुढे सादर केला.

सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या २५७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतातील पृष्ठ क्र.१८ वरील बाब क्रमांक २५७/१६ " भूतपूर्व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने ११ महिन्यांच्या लिव्ह ॲण्ड लायसन्स तत्वावर पिठाच्या गिरणी, नित्य जिवनोपयोगी गरजेच्या वस्तूंचे स्टॅालस् इत्यादिंसाठी वाटप केलेल्या भूखंडाबाबत " या विषयाबाबत प्रस्तावित केले कीं, सदर विषयास बरीच वर्षे झाली असून या बाबत निर्णय घेण्यात यावा. यावर मुख्य अधिकारी / मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ यांनी येथे एकदोन प्रकरणांचा विचार न करता संपूर्ण प्रकरणांचा विचार होणे आवश्यक आहे व त्याअनुषंगाने सर्व्हे करुन व विश्लेषण करुन प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना सन्माननीय सदस्यांनी यापूर्वी दिल्या आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही सुरु असल्याचे व कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर सदर प्रस्ताव प्राधिकरणासमोर सादर करण्यात येईल असे सांगितले.

मा.प्रधान सचिव / नगर विकास विभाग, सदस्य / प्रा. यांनी सदर कार्यवृत्तांताली पृष्ठ क्र.२५ वरील शेवटचा परिच्छेद " तसेच याच चेर्चेच्या अनुषंगाने मा.प्रधान सचिव / नगर विकास विभाग, सदस्य / प्रा. यांनी सूचित केले कीं, Smart City प्रशिक्षणासाठी चीन, कोरिया येथे काही अधिकारी यांना पाठविण्याचे प्रस्तावित आहे. तरी या प्रशिक्षणासाठी म्हाडा व गृहनिर्माण विभागातील तरुण, होतकरु व अभ्यासू अधिकारी/अभियंत्यांची नांवे सुचविण्यात यावीत " या ऐवजी " मा.प्रधान सचिव / नगर विकास विभाग, सदस्य / प्रा. यांनी सूचित केले कीं, चीन, कोरिया येथे Smart City चे काम सुरु आहे त्या कामकाजाची माहिती घेण्यासाठी काहीं अधिका-यांना पाठविले पाहिजे " असे असावे अशी दुरुस्ती सुचविली. सदर दुरुस्तीची नोंद घेण्यात आली.

सन्माननीय सदस्यानी बैठकीच्या प्रारुप कार्यवृत्तांतात सुचविलेल्या दुरुस्तीसह आणि दिलेल्या सुचनांसह सदर कार्यवृत्त एकमताने स्थायी करण्यात आले.

**बाब क्रमांक : २५८/२**

**विषय :- म्हाडामधील अधिकारी/कर्मचा-यांना सन २०१३-१४ या वर्षाकरीता सानुग्रह अनुदान देणेबाबत.**

---

**ठराव क्रमांक : ६६८३** **दिनांक : २०/१०/२०१४**

प्राधिकरणाने एक मताने निर्णय घेतला कीं, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व विभागीय मंडळांतील अधिकारी / कर्मचा-यांना सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाकरिता प्रत्येकी रु. ११,०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदान म्हणून अदा करण्यास प्राधिकरण मान्यता देत आहे. सदर सानुग्रह अनुदान दिनांक ०१/१०/२०१४ रोजी प्राधिकरण विभाग व विभागीय मंडळांमध्ये कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांना देय राहील.

सदर ठराव कार्यवृत्त स्थायीकरणाची वाट न पाहता पुढील अंमलबजावणी करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**बाब क्रमांक : २५८/७**

**विषय :- पवई, कोपरी येथील पंचतारांकित हॉटेलकरिता वितरीत केलेल्या १०,००० चौ.मी. भूखंडावरील संयुक्त पुनर्विकास योजनेबाबत मे.पॉपकॉर्न प्रॉपर्टिज प्रा.लि. यांनी सादर केलेला प्रस्ताव.**

**---------------------**

**ठराव क्र. : ६६८४** **दिनांक : २०/१०/२०१४**

सदर भूखंडाची निविदा प्रक्रिया करताना ही जागा हॉटेल भूखंड म्हणून झालेले आहे. मा.सर्वोच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल आहे. वरील विषयावर मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार चर्चा होऊन प्राधिकरणाने असा ठराव केला की, आता अभिन्यासामध्ये सदर भूखंडाचे स्टेटस डी.पी.रहिवाशी असल्याने तसेच म्हाडाचा मूळ उद्देश हा हॉटेल बांधणे हा नसून सर्व सामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करणे हा आहे. तसेच अभिन्यासातील शिल्लक असलेले प्रोराटा च.क्षे.नि. भारीत करण्यासाठी सदरचे निवासी भूखंड योग्य असल्याने म्हाडाने स्वत:च यावर गृहनिर्माण योजना राबविली तर जास्त लोकांना फायदा देता येईल. ही बाब मा.सर्वोच्च न्यायालयासमोर प्रतिज्ञापत्र दाखल करुन मांडण्यात यावी, यास प्राधिकरण मंजूरी देत आहे.